आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १७४ वा ● मंगळवार दि. १० डिसेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – अहो, ते लाडक्या बहीणीचे काय झाले, हीच कुजबूज मुंबई, नागपूर, शहरातील राजधाणी, उपराजधाणी क्षेत्रात चर्चीली जाते आहे, याचे गौडबंगाल काय असावे, हे कळतच नाही. त्यामुळे कोणास काय बोलावे, हेच कळत नसल्यामूळे डोक सैराट झालेलं आहे.

दुसरा – अरे, लाडकी बहिण योजना ही, उपमुख्यमंत्री अजित पवार यानी लादली, त्यामूळे नाईलाजाने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ती कार्यरत ठेवली. पण आजघडीला विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहिण योजनेच्या संदर्भात त्या त्या बहीणीचे उत्पन्न कीती, कौंटूबीक उत्पन्न की, याचा लेखाजोखा प्राप्त करुन उद्याला लाडक्या बहीणीला अनुदान देण्या संदर्भात जी चर्चा होते आहे, ती राजकीय वाटते.

एक – अहो, महाराष्ट्राच्या राजकारणा मध्ये सत्ता संपादन करण्यासाठी अजित पवारांच्या माध्यमातून एकनाथ शिंदे यांनी स्वार्थ साधला, परंतू विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे चौकशीचा कांगावा करुन शिंदे, पवारांना डावलणार नाही कशावरुन अशी शंका आल्यामुळे मी बोलतो आहे.

दुसरा – अरे फडणवीस हा मुख्यमंत्री असला तरी तीची बागडोर शिंदे सेना आणि पवारांच्या राष्ट्रवादीसह सहमंतीच्या घटक पक्षा मुळे सत्ताकारण घडत असले तरी उद्याच्या विश्वास दर्शक ठरावा मध्ये काय घडेल हे सांगाता येत नाही. त्यामूळे तू शांत बसं.

## काय बोलता राव ?

राज्यकर्त्याच्या चिठ्ठीवर पोलीस अधिकारी यांच्या बदल्या करण्याची गरजच काय, कारण ग्राम पंचायतीच्या कोतवाला पासून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या बदलाची राजकीय घौड दौड होतच असते. त्यामूळे राज्यकर्त्याच्या चिठ्ठीला एवढं महत्व काय द्यावे अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

**काय बोलता राव !**

अरे, माजी पोलीस महासंचालक डॉ. मिरा बोरवनकर यांच्या मतानुसार राज्यकर्त्याच्या चिठ्ठीवर पोलीसांच्या बदल्या होत असतील तर त्या संदर्भात काय बोलावे असे स्पष्टीकरण छत्रपती संभाजीनगर येथील एका कार्यक्रमात बोरवनकर यांनी खंत व्यक्त केली.

आजघडीला तत्कालीन पोलीस महासंचालक डॉ. मिरा बोरवनकर यांना डावलून निवडणूकीच्या काळात तत्कालीन संजीव शुक्ला यांना महासंचालक पद बहाल केले होते. तत्पूर्वी रश्मी शुक्ला या महासंचालकपदी कार्यरत असताना त्यांना बाजूला करुन त्या बसल्यात, त्या बदल्यात इतरांना महापद देवून राज्य सरकारने जे कांही कुटील डाव खेळले गेले त्यामूळे राज्यकर्त्याच्या चिठ्ठीवर पोलीसांच्या बदल्या होत असतील तर त्यास जवाब कोण देणार, अशीच कुजबूज राजपत्रीत सेवा अधिकारी सविता बापट, जेष्ठ पत्रकार संजय कुलकर्णी, अजित भागवत, हेंमत मिरखेलकर अशा औरंगाबाद परिसरातील जेष्ठानी असा प्रश्नात्मक विचार मांडल्यामुळे उद्याचे काय, मग बोला दाजीबा !

## दिवंगत सदस्यांना विधानसभेत श्रद्धांजली

मुंबई, : विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात




विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांनी दिवंगत सदस्यांचा शोकप्रस्ताव विधानसभेत मांडला. दिवंगत सदस्यांना सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली.

दिवंगत उद्योगपती रतन नवल टाटा, माजी सदस्य तथा माजी मंत्री मधुकर काशिनाथ पिचड, माजी सदस्य तथा माजी मंत्री रोहिदास चुडामण पाटील, माजी सदस्य तथा माजी राज्यमंत्री बाबा झियाउद्दीन सिद्दीकी, लोकसभा सदस्य व माजी वि.स.स. वसंतराव बळवंतराव चव्हाण, माजी वि.स.स. ज्ञानेश्र्वर रावसाहेब पाटील, निवृत्ती विठ्ठलराव उगले, रामकृष्ण रघुनाथ पाटील, उल्हास नथोबा काळोखे, अर्जुनसिंग पिरसिंग वळवी, हरीराम आत्मारामजी वरखडे, सिताराम भिकाजी दळवी, विजय ऊर्फ आप्पा दत्तात्रय साळवी व हरिश्र्चंद्र देवराम चव्हाण यांच्या दुःखद निधनाबद्दल विधानसभेत शोक प्रस्ताव सादर करण्यात आला.

दिवंगत सदस्यांच्या कार्याला अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी उजाळा दिला. सभागृहात दोन मिनिटे मौन बाळगून दिवंगत सदस्यांना सर्व उपस्थित सदस्यांनी श्रद्धांजली वाहिली.

# सत्ताकारणाच्या सापसिडीच्या खेळात, कोण बाजी मारणार ?

लातूर (दैलाप्रप्र) : महायुतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधी घेतल्यामूळे सहयोगी घटक पक्ष असलेल्या शिंदे सेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी अजित पवार यानी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली असली तरी महाराष्ट्रातील विभागीय रचणेनुसार किंवा जिल्हास्तरीय सत्तेबाबत मंत्रीपद कोणाला द्यावे आणि राज्य मंत्री पदाचे लोडणे कोणाच्या गळ्यात घालावे हा राजकीय पेच धास्तावणारा दिसतो आहे. त्यामूळे लातूर जिल्ह्यातील राजकीय समिकरणात कुतहल निर्माण झाल्याचे दिसते आहे.

मराठवाड्यातील कॉग्रेसी पर्व संपल्यामुळे लातूर शहर व जिल्ह्यात कॉग्रेसची नमुस्की झाली, महाविकास आघाडीला शुन्यातून शुन्य अस्तीत्व राखावे लागले. परंतू महायुतीने आपापला गड शाबुत ठेवल्यामूळे महायुतीतील भाजपाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असल्यामूळे लातूर शहराला भाजपाचा मुख्यमंत्री या पदावरुन मंत्री पदाला कोणताही सहारा नसावा अशी कुजबूज होत असून एकंदरीतरित्या माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लातूर जिल्ह्यात प्रतिनिधीत्व नसल्यामूळे अजित पवार गटातील माजी मंत्री संजय बनसोडे की, तीन वेळा आमदार असलेले बाबासाहेब पाटील यांची मंत्री पदी वर्णी लागणार की काय अशीच कुजबूज होत असून भाजपा वर्तूळात निलंगेकर, अभिमन्यू पवार, किंवा रमेश कराड यांची अवस्था घर का ना घाटका, अशीच अवस्था झाल्याचे दिसते आहे. त्यामूळे बाबासाहेब पाटील यांच्या प्रयत्नातून संजय बनसोडे हे वर्चढ होतात की काय, अशीच कुजबूज होत असल्यामूळे लातूरला मंत्री पद मिळेल की नाही, अशीच सर्वसामान्य जनतेतून लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

# सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी श्रीधर स्वामी ; सचिवपदी संतोष करमले

लातूर : सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी श्रीधर सांबय्या स्वामी यांची तर सचिवपदी संतोष करमले यांची निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक ग्रंथालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्र्नांची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने सदाशिव बेडगे यांनी पुढाकार घेऊन राज्यव्यापी विकास परिषदेची स्थापना केली आहे.

रविवार, दि. ८ डिसेंबर रोजी लातूर येथे सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभाग उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीचे सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या मागच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या वेतनश्रेणी, सेवानियम , अनुदान वाढ आदी प्रश्र्नांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. शासन सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रश्र्नांकडे फारसे गांभीर्याने पाहत नसल्याबद्दल या बैठकीत चर्चा करण्यात



आली. सोलापूर येथील ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे लढाऊ नेते सदाशिव बेडगे यांनी याकरिता पुढाकार घेऊन सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास कर्मचारी परिषदेची स्थापना केली आहे. या परिषदेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असणार आहे.

या परिषदेच्या लातूर जिल्हा कार्यकारिणीची या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यकारीणीतील अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. उपाध्यक्ष सूर्यकांत कमलाकर जाधव, वैशाली दुरुगकर , चंद्रशेखर हणमंतराव ढगे , सहसचिव नागेश्र्वरी ज्ञानोबा पांचाळ, गुप्तलिंग शिवमूर्ती स्वामी, खजिनदार विद्यासागर गुलाब गायकवाड, सदस्य : हणमंत गोपाळराव भवाळ, रेहान नबीसाब सय्यद, निवृत्ती विठ्ठलराव सूर्यवंशी, गजयसिंह माधवसिंह चौहान, गोविंद गुणवंतराव पाटील, विलास व्यंकटराव नागरगोजे, गिरीधर रंगनाथ जंगाले , सोपं तुळशीराम सूर्यवंशी, शिवहार गुंडेराव बिराजदार, मनिषा दत्तात्रय भिसे, नागनाथ सुग्रीव नागरगोजे, अमरसिंह गंगाधर चव्हाण, कृष्णा विश्र्वनाथ पिंजरे.

नूतन कार्यकारिणीचे परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, कार्याध्यक्ष सुनीलदत्त पाटील, उपाध्यक्ष विजय पाटील, सचिव धोंडीराम जेऊरकर यांसह ग्रंथालय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी राज्य शासन ठाम उभे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : कर्नाटक सरकारकडून बेळगावसह सीमा भागातील मराठी भाषिक जनतेवर सुरु असलेल्या अन्यायाचा आम्ही निषेध करतो. मराठी माणसांनी मेळावे घेऊ नयेत, अशी कर्नाटक सरकारने घेतलेली भूमिका घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन करणारी आहे. तसेच कर्नाटक सरकारमधील एका मंत्र्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची कर्नाटक विधानसभेतील प्रतिमा काढणार असल्याचे वक्तव्य केले, हे गंभीर असून या घटनेचा राज्य शासन निषेध करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले. तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असून बेळगाव, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र होत नाही तोवर आमचा लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यातील १२ कोटी जनता आणि जगभरातील मराठी माणूस कर्नाटक सीमाभागातील मराठी माणसाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी आम्ही शिक्षण, आरोग्य सेवा उपलब्ध केल्या आहेत. यापुढे देखील सीमा भागातील मराठी भाषिकांचे प्रश्र्न सोडवण्यासाठी आमचे सरकार तत्पर राहील.

**मराठी भाषिकांना विरोध करणारी कर्नाटक सरकारची भूमिका अन्यायकारक – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सीमा भागातील मराठी भाषिकांच्या मेळाव्याला कर्नाटक सरकारने विरोध केला. महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य यांना अटक करण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींना स्थानबद्ध करण्यात आले. या कर्नाटक सरकारच्या कृत्याचा महाराष्ट्र शासन तीव्र निषेध करीत आहे. मी देखील मराठी भाषिकांच्या लढ्यात तुरुंगवास भोगला असून हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जी भूमिका होती तीच भूमिका आमच्या सरकारची आहे. सर्वोच्च न्यायालयात शासनाच्या वतीने वकील दिले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे देखील यापूर्वी या प्रश्र्नाबाबत बैठक झाली होती. या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा होऊन देखील कर्नाटक सरकार अशी भूमिका घेत असेल तर कर्नाटक सरकारच्या या भूमिकेचा आम्ही निषेध करतो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत बोलताना स्पष्ट केले.

याबाबत विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी प्रश्र्न उपस्थित केला होता.

## उद्योगपती रतन नवल टाटा यांच्यासह दिवंगत सदस्यांना विधानपरिषदेत श्रद्धांजली

मुंबई, : विधानपरिषदेत उद्योगपती रतन नवल टाटा यांच्यासह दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यासंदर्भातील शोकप्रस्ताव मांडला.

उद्योगपती रतन नवल टाटा यांच्यासह माजी वि.प.स. व माजी मंत्री रोहिदास चुडामण पाटील, लोकसभा सदस्य व माजी वि.प.स. वसंतराव बळवंतराव चव्हाण व सर्वश्री निवृत्ती विठ्ठलराव उगले, नरेंद्र बाबुराव बोरगावकर यांच्या दुःखद निधनाबद्दल विधानपरिषदेत शोक प्रस्ताव मांडला.

# लातूर जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवार पुन्हा आक्रमक

लातूर : लातूर जिल्हा रूग्णालय जागा हस्तांतरण शासन आदेश १९ जून २०२४ यानुसार १८ ऑगस्ट २०२४ पर्यंत म्हणजेच ६० दिवसांच्या आत ही प्रक्रिया पूर्ण होणे बंधनकारक होते मात्र हा अवधी संपून आज ११३ दिवस उलटले आहेत. सरकार जरी नवे असले तरी माझं लातूर परिवाराने ज्यांच्याकडे पाठपुरावा केला आहे ते सर्व सन्माननीय नेते, आमदार, मंत्री याही सरकारचा भाग राहणार आहेत. आतातरी या सामाजिक विषयास न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे.




आजपासून पुन्हा एकदा हा प्रश्र्न निकाली काढण्यासाठी माझं लातूर परिवार मैदानात उतरत आहे. मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत लातूर जिल्हा रूग्णालय हा बहुचर्चित आणि प्रलंबित विषय मार्गी लागेल हा विश्र्वास आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी ज्यांना हा विषय जवळपास तोंडपाठ झाला असेल. आता ती वेळ आली आहे. सर्व शासकीय, प्रशासकीय सोपस्कार पूर्ण झालेली आहेत. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांना देखील वेळोवेळी या विषयाचे गांभीर्य लक्षात आणून देण्यात माझं लातूर यशस्वी ठरले आहे. जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी एकत्रित येऊन जिल्हा रूग्णालय पदरात पाडून घ्यावे असे आवाहन परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. आता यापुढील काळात माझं लातूर परिवार गाफील राहणार नाही हे लक्षात ठेवावे. गेल्या १४ महिन्यांपासून संवेधानिक मार्गाने सुरू असलेला हा लढा आता अधिक आक्रमक आणि तीव्र करण्यात येईल अशी माहिती माझं लातूरने दिली आहे.

*जिल्हा रुग्णालय आंदोलनावर दृष्टिक्षेप*

२ ऑक्टोबर २०२३ पासून बेमुदत साखळी उपोषणाने प्रश्र्न ऐरणीवर. शासनाने १ महिन्यात विषय मार्गी लागेल असे आश्र्वासन दिले होते.

१) आमदार संभाजी पाटील निलंगेकर
– ४ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती
२) आमदार अभिमन्यू पवार
– ४ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती
३) आमदार अमित देशमुख
– ३ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती
४) तत्कालीन मंत्री संजय बनसोडे
– मंत्रालयात भेट, लातूरात ३ वेळा भेट, निवेदन, विनंती
५) आमदार रमेश कराड
– DPDC बैठकीत विषय मांडावा म्हणून निवेदन सादर
६) तत्कालीन पालकमंत्री गिरीष महाजन
– मंत्रालयात भेट, ३ वेळा लातूरात भेट, निवेदन, विनंती
७) तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
– मंत्रालयात भेट, निवेदन, विनंती
८) तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार
– ३ वेळा प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर, विनंती
९) तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजी सावंत
– मुंबई निवासस्थानी प्रत्यक्ष भेट,निवेदन, विनंती.
१०) तत्कालीन मंत्री उदय सामंत
– लातूर येथे प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती
११) माजी मंत्री दिलीपराव देशमुख
– ३ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती
१२) तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे
– वर्षा बंगल्यावर प्रत्यक्ष भेट, लातूर येथे ३ वेळा भेट, निवेदन, विनंती १३) तत्कालीन मंत्री धनंजय मुंडे – ३ वेळा फोनवर संपर्क १४) मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री (दोन्ही),आरोग्य मंत्री, पालकमंत्री, यांना आजपर्यंत ४२ वेळेस मेल करून विनंती. १५) आमदार विक्रम काळे – ३ वेळा फोनवर संपर्क, सविस्तर माहिती, विनंती. १६) तत्कालीन मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांचे मुखवटे घालत प्रतीकात्मक भीक मागून निधी संकलन. शासनस्तरावर अविरत पाठपुरावा, जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य सचिव यांच्यासोबत अनेकदा चर्चा. फलित – फसवा शासन आदेश काढून लातूरकरांचा विश्र्वासघात. ३ कोटी ३२ लाख ६८ हजार रुपये निधी उपलब्ध नाही शासनाकडे. शासन आदेशाची मुदत संपून ४ महिने होत आले आहेत. शासनाकडून जिल्हा रूग्णालय संदर्भात होत असलेली दिशाभूल आणि विश्र्वासघात संयमी, सहनशील लातूरकर कधीही विसरणार नाहीत.

*माझं लातूर परिवार*

## विधानपरिषद विशेष अधिवेशनाचे कामकाज संस्थगित

मुंबई, : विधानपरिषदेच्या विशेष अधिवेशनाचे कामकाज संस्थगित करण्यात आले असून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन दि. १६ डिसेंबर २०२४ रोजी नागपूर येथे होणार असल्याची घोषणा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली. राष्ट्रगीताने अधिवेशन कामकाजाची सांगता करण्यात आली.



आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# भारतीय सेनेतील सैनिक आपला अभिमान आहे – प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे

बाभळगाव : भारत मातेचे रक्षण करणे हे



पवित्र कर्तव्य आपले भारतीय जवान पार पाडत असतात. आपली भूमी प्राणापेक्षा त्यांना प्रिय असते. तिचे रक्षण करण्यासाठी जीव धोक्यात घालून ते सीमेवर लढत असतात. म्हणूनच आपण इकडे सुखी असतो. त्यांनी देशसेवेचे व्रत स्वीकारलेले असते. चोवीस तास कर्तव्यासाठी जागृत असणारा सैनिक कठीण प्रसंगी सर्वांना मदत करतो. आज आपल्या महाविद्यालयाचा शुभम दिनकर बोयणे हा विद्यार्थी भारतीय सेनेत रुजू झाल्यामुळे त्याचा आपणाला सार्थ अभिमान आहे. त्याचा आदर्श तरुणाने घेतला पाहिजे. असे प्रतिपादन आचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता. जि. लातूर येथील बीए मध्ये शिकत असलेला शुभम दिनकर बोयणे या विद्यार्थ्याने इंडियन आर्मी ट्रेनिंग सेंटर गोवा येथे सलग आठ महिने कठोर प्रशिक्षण घेऊन यश संपादन केले आहे. जम्मू काश्मीर राजुरी येथे भारतीय सैन्य सेवेत ते रुजू झाले. महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा एका समारंभामध्ये सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष स्थानावरून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे बोलत होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. नरेंद्र देशमुख यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. इंद्रजीत शिंदे व आभार डॉ.अभिजीत बादाडे यांनी मानले. यावेळी प्रा.चंद्रकांत मोरे, स्टाफ सचिव डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर विद्यार्थी प्रतिनिधी ओंकार सुरवसे, बोचणे परिवारातील मामा भरत जन्मले, काका एकनाथ गोडगे, काका संजय मुडे मोठा भाऊ रविशंकर बोयणे महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# खरोळा येथे अवधूत जन्मोत्सवाचे आयोजन चरित्रग्रंथाचेही होणार प्रकाशन पुरणपोळीच्या महाप्रसादाने होणार उत्सवाची सांगता

रेणापूर /प्रतिनिधी: तालुक्यातील खरोळा



येथील दत्त मंदिरात शनिवार दि.१४ डिसेंबर रोजी अवधूत जन्मोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. उत्सवा दरम्यान श्री सदानंद स्वामी महाराज चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा होणार असून रविवार दि.१५ रोजी पुरणपोळीच्या महाप्रसादाने उत्सवाची सांगता होणार आहे.

खरोळा येथील दत्त मंदिर पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे.येथे अवधूत जन्मोत्सवानिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षी शनिवार दि.७ डिसेंबर रोजी घटस्थापनेने उत्सवाला प्रारंभ झाला आहे.दररोज विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत आहेत.शनिवार दि.१४ रोजी अवधूत जन्मोत्सवानिमित्त सकाळी ९ वाजता ग्रंथ मिरवणूक व नगर प्रदक्षिणा होणार आहे.सायंकाळी ४ वाजता आळंदी येथील पालखी सोहळा प्रमुख निरंजननाथजी योगी महाराज यांचे प्रवचन होणार आहे. त्यानंतर ५ वाजता श्री सदानंद स्वामी महाराज चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा होणार आहे.हभप अनंत बिडवे महाराज बार्शी यांनी या ग्रंथाचे लेखन व संपादन केले आहे. ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख हभप योगी निरंजननाथजी महाराज व पांढरी संस्थान अधिपती सद्गुरू ज्ञानेश्र्वर महाराज यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. प्रकाशन सोहळ्यानंतर हभप अनंत महाराज बिडवे यांचे जन्मोत्सवाचे कीर्तन होईल.सायंकाळी ५.५० वाजता गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. याच दिवशी रात्री ८ वाजता 'मंगळसूत्र' हे व्यंकट डोंगरे लिखित सामाजिक नाटक सादर होणार आहे.रविवार दि.१५ डिसेंबर रोजी कुलाचार व पुरणपोळीचा महाप्रसाद होणार आहे.संपूर्ण गावाला पूरणपोळीचे जेवण हे येथील वैशिष्ट्य आहे.रात्री ८ वाजता ना.ल. गोरे लिखित 'जावळीचे झुंजार' हे नाटक सादर होणार आहे.मंगळवार दि.१७ रोजी पालखी मिरवणूक व नाटकांचे पडदे उतरविण्याचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. अवधूत जन्मोत्सवानिमित्त आयोजित या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन श्री दत्त मंदिर देवस्थानच्या अध्यक्षा तथा रेणापूरच्या तहसीलदार मंजुषा भगत, श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट, श्री दत्त प्रासादिक नाट्य मंडळ व श्री दत्त प्रासाद एक भजनी मंडळासह ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बळीचे बकरे कोण ?

**संपादकीय...**

स्वतःला शहाणे समजणारे राजकीय पक्षाचे नेते असोत की, राजकीय वर्तूळासह प्रसार माध्यमातील लोकप्रतिनिधी असोत, त्याचा वैचारीक बेलभंडार सर्वसामान्य जनतेच्या मानगुटीवर बसतो. परंतू सत्ताधारी किंवा विरोधक हे सर्वसामान्य विचाराच्या बाजूनेच राहून विचार न करता राजकीय दृष्ट्या स्वतःचे हित साधण्यापलिकडे दुसरा कोणताही विचार न करता आपापली पोळी भाजून घेताना दिसत आहेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या दरम्यान महायुतीला भरघोष यश मिळाले परंतू सहशक्त इतिहासाची चाळणी केल्यानंतर असे लक्षात येते की, बळीचे बकरे कोण, अणि ते कोणाच्या गळीला पडले हा विषय राजकीय दृष्ट्या महत्वाचा असला तरी तो दाब कोणाच्या मानगुटीवर बसतो याचा सर्वकस उलगडा प्रसार माध्यमे करीत नसतील तर मग बळी कोणाचा आणि बळ कोणाचे हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो अशी कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

आजघडीला सत्ताकारण, राजकारण, विरोधीकारण, हे हातचे खेळणे झालेले आहे, जेनेकरुन आजघडीला राजकारण, सत्ताकारणातील बेरीज वजाबाकी केली तर असे म्हणावेसे वाटते की, सशक्त सत्ताधारी आणि त्यातीलच विरोधक म्हणून जो कोणी पुढे येत असतील तर भातुकलीच्या खेळा मधली, राजा आणीक राणी, अर्ध्यावर्ती डाव मोडीला, ही अधुरी एक कहाणी, हे अकबरानी, मुमताजच्या प्रेम कहाणीतील शब्द असले तरी सत्ताकारणा मध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सत्तांकी मंत्री पदा मध्ये जी वर्चड होते आहे, ते चिंताजनक बाब ठरावी असे वाटते.

स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासकारणात अगरकर, टिळक, आंबेडकर यांच्या पेक्षा कोणी ही मोठा नसताना स्वतः ला जेष्ठ समजून इतिहासकार युवाल नोआ हरारी यांनी जे कांही सहशक्ये ते बद्दल विधान केले ते चुकीचे वाटते. कारण लोकशाही राज्या मध्ये बळीचे बकरे कोण होतात, आणि त्यांना बळ कोणाचे असते याचा उलगडा राजकीय नेत्यासह प्रसार माध्यमेही करत नसतात, त्यामूळे असा कोणी तरी पुढे येवून लोकशाही संविधानाची चेष्टा करतो, हे अवघड दिसते, त्यामूळे उद्याच्या लोकसभा विध मंडळ असो की, महाराष्ट्र विधानसभेचे नागपूर मधील होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात चर्चा करणे अपेक्षीत असावे अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

एकंदरीत रित्या लोकशाही संविधानाच्या माध्यमातून विचार करताना संसदीय आणि विधानसभा निहाय कार्यप्रणाली कोणत्या हेतूने पूढे जाते आहे, त्यातून सामाजीक न्याय, स्वतंत्र्य, समानता, लोकशाही, न्याय व हक्काची कशी वाटावाट होते आहे, हे लोकप्रतिनिधीना कळत नसेल तर राजकीय नेत्यांचे बाहुले बनलेल्या प्रसार माध्यमाचे डोळे आंधळे झाले आहेत की काय, अशीच कुजबूज सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसते आहे.

लोकशाही राज्यात सर्वांगीण विकास, सामाजीक न्याय, मागणी हक्कासह कायदा व सुव्यवस्थेसाठी लोकशाही प्रणालीतून राजकारभार चालविणारे हे लोकप्रतिनिधी सर्वसामान्य जनतेला बळीचे बकरे करुन लोकशाही राज्यात बळाचे साम्यर्थ दाखवित असतील तर ते वोझा कोणत्या मानगुटीवर बसेल हा इतिहास काय ते इतिहासकार सर्वसामान्य जनतेच्या साक्षीने राज्य कर्त्यासमोर ठेवतील काय असा प्रश्न चिन्ह सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसते आहे.

# राज्यातील बांधकाम कामगारांचा १८ डिसेंबर २०२४ रोजी नागपूर विधानसभेवर प्रचंड मोर्चा

**पुणे – शनिवार दिनांक ७ डिसेंबर २०२४ रोजी राज्यातील बांधकाम कामगारांचा भव्य मेळावा निळू फुले कला मंदिर राष्ट्रसेवा केंद्र सभागृह पुणे येथे घेण्यात आला या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कॉमेडी.शंकर पुजारी हे होते.तर प्रमुख मार्गदर्शक सागर तायडे,विनिता बाळेकुंद्री,राजकुमार होळीकर,आनंद भालेराव,प्रशांत मेश्राम,उस्मान शेख,प्रशांत रामटेके,काशीनाथ निखाते,मनीष गौरखेडे,रत्नदीप डोफे, राजेंद्र सुतार,शैलजा अर्नाळकर,विशाल बडवे,प्रदीप परकाले,राहुल नगराळे,उमेश कांबळे,सुनील ठोबे,नितीन वाकोडे,सिद्धार्थ बोरडे,अंकुश मूजेवार,आशीष मेश्राम इत्यादी विविध कामगार संघटनेचे मान्यवर प्रमुख पदाधिकारी यांनी कामगारांना मार्गदर्शन केले.राज्यातील ३०० पेक्षा जास्त १३९ कामगार संघटनांचे प्रतिनिधी या मेळाव्यास उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागर तायडे यांनी केले तर आभार सुनिल ढोबे यांनी मानले.**

बांधकाम कामगारांचे सर्व ऑनलाईन कामकाज त्वरित सुरू होण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्यातील ५४ लाख ३६ हजार बांधकाम कामगारांना न्याय हक्क अधिकार मिळवून घेण्याकरिता प्रचंड मोर्चा आयोजीत करण्याचा ठराव मांडण्यात आला.यातील एक दोन टक्के बांधकाम कामगार उपस्थितीत राहिले तर राजकीय हुकुमशाही, एकाधिकार शाही मोडून काढली जाईल.असे सागर तायडे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले.जात,धर्म,पंथ आणि पक्ष विसरून असंघटित कष्टकरी कामगारांनी प्रचंड मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले.मेळाव्यात एकूण १० ठराव मांडण्यात आले.

ठराव क्रमांक १) महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पूर्ववत सर्व पोर्टल काम सुरू करणे बाबत. ठराव क्रमांक २) कामगार मंत्री श्री.सुरेश खाडे यांनी जाहीर केल्यानुसार ५४ लाख बांधकाम कामगारांना प्रत्येकी ५ हजार रुपये सानुग्रह अनुदान त्वरित मिळण्याबाबत.ठराव क्रमांक ३) बांधकाम



कामगारांचे सर्व २६ लाख प्रलंबित अर्ज त्वरित मंजूर करण्याबाबत.ठराव क्रमांक ४) मंडळाचे खासगीकरण बंद करा.ठराव क्रमांक ५ ) मंडळाने कायम स्वरुपी कर्मचारी नेमावे. त्यात नोंदणी कृत कामगारांच्या सुशिक्षित मुलांना चढउखढ, उत्तीर्ण व १२ वी उत्तीर्ण मुलांना प्रधान देण्यात यावे.ठराव क्रमांक ६) नोंदणीकृत कामगार संघटनाना प्रधान देऊन विश्र्वासात घेऊन नांव नोंदणी, नूतनीकरण,कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी.ठराव क्रमांक ७) बांधकाम कामगार संघटनानी कृती समिती चे रीतसर सभासद व्हावे. आणि वार्षिक वर्गणी भरावी. ठराव क्रमांक ८) बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीची कार्यकारणी निवड करण्यात यावी. ठराव क्रमांक ९) बांधकाम कामगार कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी होण्यासाठी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा करण्यात यावी.ठराव क्रमांक १०) नागपूर हिवाळी विधानसभेवर लक्षवेधी प्रचंड मोर्चा काढण्याबाबत.या ठराव नुसार बांधकाम कामगारांचा १८ डिसेंबर २०२४ रोजी प्रचंड मोर्चा नेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

मागील सहा महिन्यांमध्ये चार बड्या कंत्राटदारांना या महामंडळाकडून १५००० कोटी रुपये वादग्रस्त योजनेवर खर्च करण्यात आलेले आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या मंडळातील अधिकाऱ्यांच्या विरोधी व शासन विरोधी असंतोष वाढत चाललेला आहे. मुंबई उच्च न्यायालयामार्फत ६ डिसेंबर रोजी महाराष्ट्र शासन व या मंडळास असा आदेश करण्यात आलेला आहे की आचारसंहितेच्या नावाखाली बंद करण्यात आलेले बांधकाम कामगारांचे सर्व कामकाज एका दिवसात सुरू करण्यात यावे. परंतु या आदेशाची अंमलबजावणी करतोय असं सांगून प्रत्यक्षात पोर्टल वर माहिती दिली जाते.मात्र सर्व प्रकारचे काम बंद केले आहे.

महाराष्ट्रामधील २६ लाख नोंदीत बांधकाम कामगारांना कसलाही लाभाचा अर्ज मंडळाकडे सध्या करता येत नाही.ते पोर्टलस त्यानी बंद ठेवलेले आहेत.इतकेच नव्हे तर कामगारांची नवीन नोंदणी व नुतनीकरण करणे बाबतीमध्ये जे तालुका कामगार सुलभ केंद्रे सुरू करण्यात आलेले आहेत ते अत्यंत आकार्यक्षम असून त्यामधून कामगारांचे कोणतेच काम होत नाही असं चित्र आहे. इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळ स्थापन झले तेव्हा पासून कायमस्वरूपी कर्मचारी मंडळाने नियुक्त केले नाही,प्रभारी आणि कंत्राटी कामगारांच्या मार्फत सर्व कामकाज चालते असे राजकुमार होळीकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाने ९ सप्टेंबर २०१४ रोजी काढलेल्या आदेशानुसार सर्व बांधकाम कामगारांची प्रलंबित कामे एका महिन्यात निकाली काढावीत असा आदेश आहे.परंतु हा आदेश धाब्यावर बसवून आज महाराष्ट्रामध्ये दोन दोन वर्षापासून सर्व लाभाचे अर्ज प्रलंबित आहेत.एखाद्या कामगारांचा मृत्यू झाला तरी तिच्या विधवा महिलेस अंत्यविधीसाठी मिळणारे रक्कम दोन दोन वर्षे झाली तरी मिळत नाही. इतर कल्याणकारी योजनाचा लाभ तर मिळत नाही. म्हणूनच सर्व २६ लाख प्रलंबित अर्ज ताबडतोब महाराष्ट्र शासनाने मंजूर झाल्याचे घोषित करून त्याच्याबद्दलची पूर्तता करून घेणे आवश्यक आहे. असे शंकर पुजारी यांनी सांगितले.मध्यान भोजन कोणासाठी होते त्याची अभ्यासपूर्ण माहिती आनंद भालेराव यांनी मांडली.

बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी आणि उपचारांच्या नांवावर कशी निधी लुटल्या जाते यांची माहिती प्रशांत मेश्राम यांनी मांडली.बांधकाम कामगारांच्या विविध समस्या आणि त्यावरील उपाय यावर मेळाव्यात अनेकांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.शेवटी या सर्व मागण्यांच्यासाठी १८ डिसेंबर २०२४ रोजी नागपूर हिवाळी विधानसभेवर महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांचा प्रचंड मोर्चा काढण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला अशी घोषणा शंकर पुजारी यांनी केली. करीत मोर्चास बांधकाम कामगारांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित रहावे असे आवाहन करणारे पत्रक महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना कृती समितीचे निमंत्रक कॉ.शंकर पुजारी यानी प्रसिद्धस दिलेले आहे.

**सागर तायडे यांस कडून.**

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्रैमासिक बुद्धयान अंकाचे मोफत वाटप



**बीड : डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि ६ डिसेंबर २०२४ रोजी बीड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या बंधू भगिनींना त्रिरत्न बौद्ध महासंघ या जागतिक बौद्ध चळवळीचे त्रैमासिक बुद्धयान डॉ बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती या अंकाचे मोफत वाटप धम्मचारी विरतकुमार लातूर यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने बंधू भगिनी उपस्थित होते.**

# 'ग्रेपनेट' प्रणालीवर लातूर जिल्ह्यातील निर्यातक्षम द्राक्ष बागांची नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका): लातूर जिल्ह्यामध्ये २०२४–२०२५ या हंगामात निर्यातक्षम द्राक्षबागांची नोंदणी सुरु करण्यात आली आहे. युरोपियन व इतर देशांमध्ये लातूर पटट्यातून दरवर्षी द्राक्ष निर्यात होत असतात अपेडाच्या सहकार्यालयाने ग्रेपनेट प्रणालीद्वारे निर्यातक्षम द्राक्षबागांची नोंदणी करता येणार आहे.

द्राक्ष निर्यातीला चालना देण्यासाठी राज्यात निर्यातक्षम द्राक्ष बागांची नोंदणी, तपासणी, कीड व रोगमुक्त हमी, गमार्क प्रमाणीकरण, फायटोसानिटरी प्रमाणीकरण या सर्व बाबींची ग्रेपनेट प्रणालीद्वारे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यात २०२३–२०२४ मध्ये १५० निर्यातक्षम द्राक्ष बागांची नोंदणी करण्यात आली होती. सन २०२४–२०२५ वर्षामध्ये फळे व भाजीपाला निर्यातीस चालना देण्यासाठी कृषि विभागामार्फत खास उपक्रम राबतवण्यात येत आहे. यामध्ये जिल्हास्तरावर कृषीमाल निर्यात मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी मोबाईल पचा वापर करण्यावर भर देण्यात येत आहे.

निर्यातीबरोबरच स्थानिक बाजारपेठेत ग्राहकांना कीड व रोगमुक्त फळे व भाजीपाला उपलब्ध करुन देण्यासाठी लातूर जिल्ह्याला या वर्षी ३०० द्राक्ष बागांची नोंदणी लक्षांक देण्यात आले आहे. यासाठीच निर्यातक्षम द्राक्ष बागांची 'अपेडा'च्या ग्रेपनेट या ऑनलाईन कार्यप्रणालीवर १ ऑक्टोबर २०२४ पासून मोफत नोंदणी सुरु झाली आहे. त्यानुसार अधिकाधिक द्राक्ष व आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी बागांची नोंद करावी.

जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादन शेतकऱ्यांनी कृषि सहाय्यक यांच्याकडे नोंदणी अर्ज, सातबारा, आठ अ, आधारकार्ड, मतदान कार्ड इत्यादी कागदपत्रे द्यावीत , अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव यांनी केले आहे.

# विकासकामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार होण्यासाठी प्रयत्न करा

अमरावती, : लोणार विकास आराखड्यातील विकासकामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार होण्यासह विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश लोणार विकास आराखडा समिती अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना दिले. लोणार विकास आराखड्यांतर्गत असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी व कामांच्या प्रगतीचा आढावा डॉ. पाण्डेय यांनी शनिवारी (ता.७ डिसेंबर) लोणार येथे घेतला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. श्रीमती पाण्डेय म्हणाल्या की, बुलडाणा जिल्ह्यातील बेसॉल्ट खडकात उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर हे जगविख्यात आहे. हे स्थळ जैवविविधतेने सपन्न असून पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. लोणार सरोवराच्या जतन, संवर्धन व विकास तसेच परिसराच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाव्दारे ३६९ कोटी ७८ लक्ष रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. विकास आराखड्यातील नियोजि कामे पूर्णत्वास जाण्यासाठी समितीव्दारे नियमितपणे आढावा घेण्यात येतो. आराखड्यांतर्गत येणाऱ्या विविध विकासकामांना प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार आरखड्यातील विकासकामे गतीने पूर्ण होण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. विकास आराखड्यांतर्गत येणारी लोणार सरोवर व परिसरातील नागरी सुविधांची कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

# सभागृहातील सदस्य राज्यातील जनतेचे प्रतीक; जनतेला न्याय देण्यासाठी कार्य करणार - विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर

मुंबई, : सभागृहातील सदस्य राज्यातील जनतेचे प्रतीक असून जनतेच्या आशा आकांक्षा व्यक्त करणारे हे सभागृह आहे. सभागृहाच्या वेळेचा राज्यातील जनतेच्या हितासाठी आणि न्यायासाठी उपयोग करून, जनतेला न्याय देण्यासाठी कार्य करणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी सभागृहात सांगितले.

विधानसभेत १५ व्या विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबदल सर्वांचे आभार मानत श्री. नार्वेकर म्हणाले, सदस्यांनी सभागृहात असताना समाजाच्या विकासाचा आणि समाजात वावरत असताना सभागृहाचा विचार डोळ्यासमोर ठेवून काम केले पाहिजे. सभागृहाचे कामकाज अधिक प्रभावी होण्यासाठी चतुसूत्री कार्यक्रम राबविण्यात येईल. सभागृहात सदस्यांना आपापल्या विधानसभा मतदारसंघातील समस्या मांडण्यासाठी प्रश्र्नोत्तराच्या तासाचे विशेष महत्व आहे. समिती पद्धती हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे, तर कायदा निर्मिती हे विधानमंडळाचे अंगीभूत महत्वाचे कार्य असल्याचे त्यांनी सांगितले. राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे कल्याणकारी संकल्पनेची प्रभावी अभिव्यक्ती आहे. सदस्यांना अर्थसंकल्पावरील चर्चा करण्यासाठी पुरेसा अवधी देऊन, मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वानी कार्य करून विधिमंडळ कामकाज करत असताना दोन्ही बाजूंचे सहकार्य आवश्यक असल्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.




# अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ईपीएस-९५ पेन्शन वाढीबद्दल सरकारचे मौन का?

कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी.यासाठी अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरू आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकड्डन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.

ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.त्यामुळे एनडीए व इंडिया आघाडी यांनी सामंजस्याने एकत्रितपणे निर्णय घेवून सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशनधारकांचा मार्ग मोकळा करून यावर पुर्णविराम लावावा. ईपीएस-९५ पेंशनधारक न्याय मिळेल या आशेवर पेंशन धारकांची आताही उम्मीद टीकुन आहे. म्हणजेच उम्मीद पर दुनिया कायम है लोकसभेत दुनीयाभराचा गोंधळ होतो व सभा तहकूब होते व यावर करोडो रूपयांचा चुराडा होतो.परंतु करोडो पेंशन धारकांबद्दल पक्ष-विपक्ष एकमत होत नाही ही वृध्दाच्या प्रती (सिनियर सिटीझन)च्या प्रती मोठी शोकांतिका आणि दुर्भाग्य म्हणावी लागेल.परंतु आमदार-खासदार आपले पगार व पेंशन वाढीचे विधेयक एका मिनिटात सर्वानुमते पारीत करतात.परंतु ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत, मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते आहे.परंतु पेन्शन धारक आशावादी आहेत त्यामुळे सरकार त्यांना अवश्य न्याय देईल असा पेंशन धारकांना विश्र्वास आहे. आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.या अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा१००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य पक्ष-विपक्ष किंवा सरकारला का दिसत नाही?त्यामुळे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस पेन्शन धारकांचा विचार करून कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागू करण्याची घोषणा सरकारने करावी.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर,महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो.

हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने व पक्ष-विपक्षाने ताबडतोब घ्यावी व ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्र्न मार्गी लावावा.केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले आहेत. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे.त्यामुळे आता सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता चालू असलेल्या अधिवेशनात कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्र्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे याचे संपूर्ण दायित्व पक्ष-विपक्षांचे आहे. देशात अनेक कठीण प्रश्र्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु आज १४० कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी दिड कोटी पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.

सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी व पेन्शनसाठी वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दुःख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू आहे याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. मागील अधिवेशनात सरकारने अनेक विधेयक आणलीत व मंजूर केली.परंतु पेन्शन धारक आपल्या हक्काची लढाई लढत असताना सुध्दा त्यांच्या हाती निराशाच आली. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते.

ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते.मागील अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफचा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्र्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर.

त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्र्न आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सुरू असलेल्या अधिवेशनात ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत.त्यामुळे पेन्शन धारकांना विश्र्वास आहे की ईपीएस १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्र्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे.

ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे.शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने व पक्ष-विपक्षाने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्र्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत. परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दा चालू अधिवेशनात कमी कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या दिड करोड पेंशन धारकांना आहे.जय हिंद!

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर).**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत.

महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे.

दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्र्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे.

विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही.

त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# काँग्रेस पक्षाचा ईव्हीएम बाबतचा संशय केवळ नैराश्यापोटी आहे - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर : महाराष्ट्रातील महाविकास आघाडीने गेल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात महिला भगिनींसाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सर्वसमाजाच्या मुलींना एमबीबीएस सहीत सर्व शिक्षण मोफत, शेतीसाठी लाईट मोफत असे असंख्य ऐतिहासिक निर्णय मा.एकनाथराव शिंदे साहेब, मा.देवेंद्रजी फडणवीस, मा.अजितदादा पवार सरकारने घेतले, ते आतापर्यंच्या ७५ वर्षात देशातील कोणत्याही राज्यात घेण्यात आले नाहीत. त्यामुळे राज्यातील लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, शेतकरी, युवक व सर्व जाती धर्माच्या मतदारांनी भरभरून मते दिली. त्यामुळे महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला. महाराष्ट्राबरोबर झारखंडमध्ये विधानसभा निवडणूक झाल्या.

त्या ठिकाणी भाजपा आघाडीने प्रयत्न करूनही आम्हाला ८१ पैकी २१ जागा आल्या व झारखंड मुक्ती मोर्चाचे सरकार सत्तेत आले. या मतदारांच्या निर्णयाचे भाजपा नेत्यांनी स्वागत केले. परंतु महाराष्ट्राच्या निकालानंतर लातूरचे आमदार अमितभैय्या देशमुख व काँग्रेस नेत्यांना ईव्हीएम मशीन बाबत संशय व्यक्त केला, ही प्रतिक्रीया पराभवाच्या नैराश्यातून केली असून ही प्रतिक्रीया जनतेची दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाभिमुख जनतेने दिलेल्या ऐतिहासिक आशीर्वादाचे आम्ही स्वागत करतो, अशी प्रतिक्रीया भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.

# मांजरा, तेरणा, तावरजा व मसलगा सिंचन प्रकल्पातील पाणी मागणीसाठी १७ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

लातूर, : लातूर पाटबंधारे विभाग क्रं. १ अंतर्गत मांजरा व तेरणा या दोन मोठ्या प्रकल्पातील, तसेच तावरजा व मसलगा मध्यम प्रकल्प, लघु प्रकल्प, साठवण तलाव व बॅरेजस आदी प्रकल्पातील पिण्यासाठी आवश्यक आरक्षित पाणीसाठा वगळता उर्वरित पाणी रब्बी हंगामात सिंचनासाठी देण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी १७ डिसेंबर २०२४ पर्यंत संबंधित पाटबंधारे विभागाच्या शाखा अधिकारी कार्यालयात पाणी मागणी अर्ज सादर करावेत, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता अ. न. पाटील यांनी कळविले आहे.

रब्बी हंगाम २०२४-२५ करिता सर्व सिंचन लाभधारकांनी पाणी अर्ज नमुना ७ व ७ अ शासनाने सुधारित केलेल्या नमुन्यात संबंधित शाखा अधिकारी यांचे कार्यालयात पाणी अर्ज भरून शाखा अधिकारी यांच्या कार्यालयात १७ डिसेंबर २०२४ पर्यंत सादर करावेत. तसेच कमी पाण्यात येणारी रब्बी हंगामी पिके प्राधान्याने घ्यावीत. प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा विचार करता, प्रवाही सिंचनावरील ऊस आदी बारमाही पिकांसाठी वर्षभर पाणी उपलब्ध राहील, याची शाश्र्वती देता येणार नाही. त्यामुळे बारमाही पिकांची लागवड करताना याबाबीचा विचार करावा आणि काटकसरीने पाणी वापरावे.

अर्जदार हा संबंधित जमिनीचा मालक असणे आवश्यक आहे. पाणी अर्जासोबत सातबारा उतारा सादर करावा. मागील थकबाकी पूर्ण भरावी व रितसर पावती घ्यावी. पाणी मागणी क्षेत्र ०.२० आरच्या पटीत (कमीत कमी ०.२० आर क्षेत्र) असावे. तसेच अर्जासोबत थकीत पाणीपट्टी भरल्यानंतर पाणी अर्ज मंजूर करण्यात येईल. पाणी अर्ज मंजूर झाल्यानंतर पिकास पाणी घ्यावे. आपआपल्या हद्दीतिल शेतचाऱ्या दुरुस्तीची जबाबदारी संबंधित बागायतदाराची राहील. शेतचारी नादुरुस्त असल्यास मंजुरी दिली जाणार नाही व पाणी दिले जाणार नाही. मंजुरीपेक्षा जास्त क्षेत्र सिंचीत केल्यास हंगामी दराच्या दीडपट दराने आकारणी केली जाईल. पाणी अर्ज न देता पाणी घेतल्यास बिनअर्जी क्षेत्राचे पंचनामे करुन दंडनीय दराने आकारणी करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा सिंचन परवानाधारकाने त्यांचे मंजूर क्षेत्रास ठरवून दिलेल्या तारखेस पाणी कालव्याच्या शेवटपासून ते सुरवात याप्रमाणे घ्यावे. सिंचन नियोजन असल्यास मंजूर कालावधी सोडून कृषीपंप चालू ठेवल्यास सिंचन अधिनियम १९७६ चे कलम ९७ नुसार विद्युत पुरवठा खंडीत करणे, विद्युत मोटारी जप्त करणे, पाणीपरवाना रद्द करणे, व बिगर पाळी पंचनामा करण्यात येईल. शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या प्रचलीत पाणीपट्टीच्या दराने आकारणी करण्यात येईल व त्यावर २० टक्के स्थानीक कर आकारला जाईल. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा काही अपरिहार्य कारणामुळे अथवा तांत्रिक कारणास्तव पाणीपुरवठा शक्य न झाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी पाटबंधारे विभागावर राहणार नाही.

प्रसिद्ध केलेल्या पाणी पालीच्या नियोजनाच्या कालावधीत काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक अडचणी उदभवल्यास या जाहीर निवेदनाद्वारे देण्यात आलेल्या पाणी पाळीच्या नियोजनामध्ये बदल करण्याचे हक्क लातूर पाटबंधारे विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवले आहेत. उपसा सिंचन परवानाधारकांनी इतरांना पाणी दिल्यास किंवा मंजूर सिंचन परवान्यातील ५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेची विद्युत मोटार आढळल्यास सिंचन परवाना रद्द करण्यात येईल. जबरदस्तीने अथवा विनापरवानगी गेट उघडल्यास, कालवा फोडून पाणी घेतल्यास पाटबंधारे अधिनियम १९७६ चे खंड क पोटकलम क व ख अन्वये दंडात्मक आणि कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा व ठिबक सिंचन पाणी परवानाधारकांचे पाणी अर्ज प्रथम प्राधान्याने मंजूर करून एकपट दरानेच अकारणी करण्यात येईल. तसेच ज्या लाभधारकांचे पाणी परवाने उपलब्ध नाहीत, त्या लाभधारकांस विनापरवाना व अनाधिकृत पाणी उपसा समजून संबधितास दिडपट दराने अकारणी करण्यात येईल. त्यामुळे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त लाभधारकांनी पाणी परवाने घेवूनच सिंचनासाठी पाणी घ्यावे व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांनी केले आहे.

# स्वयंघोषित संघटन काढून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न- तालुकाध्यक्ष पांचाळ

माजलगाव(प्रतिनिधी) : मागील दोन दिवसांपूर्वी वर्तमानपत्रातून प्रभु विश्र्वकर्मा संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदी शामसुंदर पांचाळ यांची निवड झाल्याचे प्रकाशित झालेले वृत्त चुकीचे असून नियमबाह्य संघटनेचा आणि विश्र्वकर्मा सुतार समाज संघटनेचा संबंध नसुन स्वयंघोषित संघटन काढून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न असल्याचे



विश्र्वकर्मा सुतार संघटनेचे अधिकृत माजलगांव तालुकाध्यक्ष परमेश्र्वर(आमसुले)पांचाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे.

ते म्हणाले आहे कि,कुठल्याही संघटनेच्या पदाधिकारी निवडी अगोदर आधीच्या पदाधिकारी यांचे राजीनामे देणे बंधनकारक असते.मात्र काही अतिउत्साही समाज बांधवांनी हे सर्वच नियम बाजूला सारून आपले वैयक्तिक हित पाहून आणि समाजात फूट पाडण्यासाठी थोडसं नाव बदल करून स्वयंघोषित संघटन काढून स्वतःच्या स्वार्थासाठी आणि इतर समाजाला विश्र्वासात न घेता अध्यक्ष झाल्याचा कांगोवा केला,ही बाब पूर्णपणे समाज विरोधी आहे.

त्यामुळे या स्वयंमघोषित संघटनेचा आणि श्री विश्र्वकर्मा सुतार समाज संघटनेचा जी संघटना केवळ आणि केवळ समाजाच्या सर्व अडीअडचणी साठी कार्यरत असते.त्या संघटनेचा या अनधिकृत व स्वयंघोषित अध्यक्ष शामसुंदर पांचाळ यांचा काहीही संबंध नाही.या पदाधिकारी यांच्याशी कसल्या प्रकारचे आर्थिक व्यवहार करू नये,असे आवाहन विश्र्वकर्मा सुतार संघटनेचे अधिकृत माजलगांव तालुकाध्यक्ष परमेश्र्वर(आमसुले)पांचाळ,उपाध्यक्ष राजेभाऊ पांचाळ,सचिव अशोक दिगांबरे,राजेभाऊ रिधोरीकर,लक्ष्मण पांचाळ,सुभाष नन्नवरे,संतोष रत्नपारखे,वैजनाथ पांचाळ,बालाजी पांचाळ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# हात-पाय गमावलेल्यांना मिळणार मोफत हात-पाय! बीडमध्ये २२ डिसेंबरला मोफत वाटप

बीड : देशभक्त पद्मश्री रत्नाप्पा कुंभार यांच्या स्मृतीदिनामित्त बीड येथे २२ व २३ डिसेंबरला मोफत कृत्रिम हात व पाय वाटप आणि नेत्ररोग शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती रामदास कुंभार यांनी दिली.

देशभक्त पद्मश्री रत्नाप्पा कुंभार यांच्या स्मृतीदिनामित्त कुंभार समाज विकास संस्था, बीड. व साधु वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर होत आहे. हात व पाय गमावलेल्या दिव्यांग बांधवांसाठी अद्यावत टेक्नॉलॉजीव्दारे व उच्च दर्जाच्या फायबरपासून बनविलेले तसेच अत्यंत हलके व मजबूत कृत्रिम हात व पाय यांचे मोफत वाटप या शिबिरात होणार आहे. २२ डिसेंबर रोजी केले आहे. शिबिराच्या दिवशी पायाची व हाताची मापे घेतली जातील. माप घेतल्यानंतर ३० ते ३५ दिवसानंतर अवयव वितरण केले जाणार आहे. हे कृत्रिम हात व पाय लावल्यानंतर मनुष्य चालू शकतो, सर्व दैनंदिन कामे करु शकतो. जिनासुध्दा चढू शकतो, सायकल सुध्दा चालवू शकतो. तरी गरजूंनी व त्यांच्या नातेवाईकांनी २२ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत हॉटेल ग्रँड यशोदा, राष्ट्रवादी काँग्रेस भवनासमोर, बार्शी नाका रोड, बीड येथे उपस्थित राहावे.

तसेच कुंभार समाज विकास संस्था, बीड व श्री. आनंदऋषीजी हॉस्पीटल, मेडिकल रिसर्च सेंटर अहिल्यानगर (अहमदनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने २३ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बीड येथील हॉटेल ग्रँड यशोदा येथे मोफत नेत्ररोग तपासणी शिबीर होणार आहे.

या दोन्ही शिबिरांसाठी नाव नोंदणी आवश्यक असून त्यासाठी रामदास कुंभार ९८६०५७२३८३ व चनबस वायकर ९८२२४८१३८२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात संत शिरोमणी संताजी जगनाडे यांची जयंती उत्साहात साजरी

लातूर : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, जयंती महोत्सव



समिति द्वारा संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, डॉ. राहुल डोंबे, विनायक लोमटे, यशपाल ढोरमारे, संस्थेचे कर्मचारी सुभाष गलगले, गुरुप्रसाद बिराजदार, योगीराज माकणे, संगमेश्र्वर मुळे आणि नंदू काजापुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्रातील संतांनी सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र करून महाराष्ट्रात अध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या शिष्य परिवारातील संताजी जगनाडे हे एक टाळकरी होते. तुकाराम महाराजांचा संताजीवर प्रभाव होता. तुकाराम महाराज अभंग रचना करत होते आणि त्यांचे लेखनीस होण्याचा बहुमान संताजी जगनाडे यांना मिळाला सनातन्यांनी तुकोबाची गाथा इंद्रायणीत बुडवल्यानंतर संताजी महाराजांना मुखोद्गत असणाऱ्या सर्व अभंगाचे पुनर्लेखन करण्याचे काम त्यांनी केले त्यामुळे तुकारामाचे अभंगाचे तारणहार म्हणून संत संताजी जगनाडे यांना ओळखले जाते. संतानी मानवी कल्याणाचे कार्य, विचार आणि तत्त्वज्ञान पुढच्या पिढीला माहीत व्हावे याकरिता शासनाने चालवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यानिमित्ताने अनेक थोर महात्म्यांची ओळख समाजाला होते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विनायक लोमटे यांनी मानले.

